सोलापूर महानगरपालिका
प्रेस नोट

सोलापूर दि.०५/१०/२०१६ :- महापौर प्रा.सुशीलाताई आबुटे यांनी पदाधिकारी व आयुक्त तसेच अधिकारी समवेत महापौर कार्यालयात पाणी पुरवठा बाबत बैठक घेतली.

या बैठकीत दररोज पाणी पुरवठा कसे करता येईल पाणी पुरवठाची सिस्टिम, पाणी व वेळ बचत करण्यासाठी तांत्रिक अडचणी या विषयावर चर्चा करण्यात आली यावेळी उपमहापौर यांनी भरपूर पाणी आहे नियोजन नाही आतापर्यंत काय केलात पाईप लाईनची नकाशा दाखवा ४०% पाणी वाया जातो ते कमी करा झालेल्या मिटींगला प्रोसिडींग प्रमाणे कामकाजा बाबत चर्चा केली.

यावेळी सभागृह नेता संजय हेमगड्डी यांनी उजनी ,औज व हिप्परगा येथे भरपूर पाणी आहे त्याचा वापर योग्य नियोजन करणे हे काळाची गरज आहे.शहरात डबल लाईन बंद करणे,जूनी पाईप लाईन बंद करणे टेक्निकल पांईट चा विचार करता १ दिवसाआड पाणी पुरवठा करायला काहिच हरकत नाही.व्यवस्थित पाणी पुरवठासाठी जेवढे निधी मागितले तेवढे निधी दिले तरी व्यवस्थित पाणी पुरवठा का करत नाही या बाबत अधिकारींना विचारणा केली.

नगरसेवक बेरिया यांनी हद्दवाढ भागाला रात्रीच का पाणी पुरवठा करता दिवसा का करत नाही असे विचारले.तसेच गटनेता आनंद चंदनशिवे , नाना काळे, विनायक कोंडयाल, आरिफ शेख, राजकुमार हंचाटे यांनी ही या विषयावर चर्चा केली.

आयुक्त वि.ना.काळम यांनी सांगितले की, पदाधिकाऱ्यांचा दररोज पाणी पुरवठा करा असे पत्र दिले होते या विषयावर अधिकारी यांचे समवेत सविस्तर चर्चा केले असता भरपूर पाणी असले तरी तांत्रिक अडचणी मुळे दररोज पाणी पुरवठा करता येत नाही.आहे त्या पाणी पुरठा सिस्टीम मध्ये सुधारण करुन १५ दिवसा नंतर दोन दिवसा आड पाणी कमी दाबाने काही ठिकाणी अवेळी रात्री १२ च्या आत देवू.व अमृतयोजनेतील कामे पूर्ण झाल्यावर पाणी पुरवठा करण्यामध्ये बऱ्याच सुधारणा होणार आहेत.

महापौर प्रा.सुशीलाताई आबुटे यांनी तांत्रिक अडचणी मुळे दररोज पाणी पुरवठा देवू शकत नसले तरी दोन दिवसा आड पाणी पुरवठयाचे योग्य नियोजन करावे.नियोजनाचे प्रत महापौर कार्यालया कडे दयावे.हद्दवाढ भागाला पाणी पुरवठा रात्री न करता दिवसा करावे पाणी पुरवठा करण्याच्या कामात दिरंगाई केल्यास कारवाई केले जाईल असे आदेश दिले.

याप्रसंगी स्थापत्य समिती सभापती जगदेवी नवले, नगरसेवक दत्तात्रय बंदपट्टे, सार्व आरोग्य अभियंता मुकुंद भालेराव, उप अभियंता जी.एम.दुलंगे संजय धनशेट्टी , आर एन रेड्डी. आदि अधिकारी उपस्थित होते.

मा.संपादक,
दैनिक,---------------

उपरोक्त बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करणेस विंनती आहे.

जनसंपर्क अधिकारी
सोमपा